# द्रौपदी

भास्कर जाधव

रिया पब्लिकेशन्स्

**द्रौपदी : भास्कर जाधव**

© **सौ. जयश्री भास्करराव जाधव**
६, मेथराम अपार्टमेंट, सुर्वे कॉलनी,
ताराबाई पार्क, कोल्हापूर.
मोबाईल : ९३७१६६७७६७

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**द्वितीय आवृत्ती**
मार्च, २०१२

**किंमत**
रुपये ४३०/-

माझ्यासोबत
रखरखत्या उन्हातून वाटचाल करणारी
माझी प्रिय पत्नी
सौ. जयश्रीला
ही द्रौपदीची भावकथा
सप्रेम अर्पण

**- भास्कर जाधव**

# ऋणानुबंध

द्रौपदी ही महाभारताची नायिका. महाभारत हा आपला प्राचीन इतिहास. द्रौपदीच्या जीवनावर कादंबरी लिहिण्याची कल्पना मला सुचली ती १९७६ साली. प्रत्यक्ष लिखाणास सुरुवात १९७७ च्या जूनमध्ये झाली. तेव्हापासून आज अखेरचा हा एक दीर्घ साहित्य प्रवास. संकल्पापासून सिद्धीपर्यंतची एक प्रदीर्घ वाटचाल.

अर्थात गेल्या सात-आठ वर्षांमध्ये सातत्याने लेखनकार्य चालू होते असे मात्र नव्हे. कित्येक वेळा लेखनात खंड पडत असे. कधी वेळेवर संदर्भ मिळत नसत म्हणून, तर कधी कधी कौटुंबिक किंवा व्यावसायिक अडचणींमुळे लेखन थांबत असे. त्यातून, कोणताही एखादा प्रसंग डोक्यात संपूर्ण फुलल्याशिवाय, तो दृश्य माध्यमातून नजरेसमोर उभा राहिल्याशिवाय आणि हा प्रसंग असाच लिहायला हवा, यापेक्षा वेगळ्या पद्धतीने तो लिहिला जाणारच नाही; अशी जेव्हा मनाची पूर्ण खात्री होईल, तेव्हाच तो कागदावर उतरावयाचा हा माझ्या लेखनाचा स्वभावधर्म. त्यामुळे अनेक प्रसंग महिना महिना डोक्यात घोळलेले आणि मगच कागदावर साकार झालेले. त्यामुळे द्रौपदीची ही भावकथा पूर्ण व्हायला थोडा जास्तच अवधी लागला.

गेल्या आठ वर्षांमध्ये द्रौपदी काळजात घर करून बसली. तिच्या व्यक्तिरेखेचे अनेक पैलू माझे मीच पाहिले... अनुभवले. तिला बोलती केली; आणि ती जे बोलली तेच लिहून काढले. संपूर्ण कादंबरीभर द्रौपदी स्वत:च बोलते आहे. एका अर्थाने हे द्रौपदीचे आत्मचरित्रच आहे. फक्त शब्दांकन माझे.

द्रौपदी लिहीत असताना मूळ महाभारताबरोबरच अनेक टीका-ग्रंथांचीही खूप मदत झाली. दोन सुप्रसिद्ध लेखिकांच्या पुस्तकांचा उल्लेख करणे या ठिकाणी

मला अगत्याचे वाटते. पैकी पहिल्या आहेत सुप्रसिद्ध हिंदी लेखिका महादेवी वर्मा. श्रीमती महादेवी वर्मा यांच्या 'मेरा परिवार' या पुस्तकात 'मोरनीची अंडी ससा फोडतो आणि त्याच्या अपराधाचे प्रायश्चित्त मोर त्याला देतो', अशी एक सत्यघटना आहे.

याच घटनेवरून, 'द्रुपदराजाच्या पशुशालेत पाच मोरांत एक मोरनी असते. तिने घातलेली अंडी ससा फोडतो. ते पाहून पाचही मोर त्या सशावर हल्ला करून त्याला रक्तबंबाळ करतात', हे उपकथानक मला सुचले आहे. द्रौपदीच्या पाच मुलांची अश्वत्थामा हत्या करतो आणि त्याची भयंकर किंमत त्याला पांडवांकडून मोजावी लागते. कादंबरीच्या उत्तरार्धात घडणाऱ्या या घटनेचे प्रतीक म्हणून द्रौपदीच्या बालपणी त्या उपकथानकाचा मी वापर केला आहे.

दुसऱ्या लेखिका आहेत डॉ. इरावती कर्वे. कै. इरावतीबाईंच्या 'युगान्त' या पुस्तकातील द्रौपदीच्या शेवटाचा माझ्या कादंबरीच्या शेवटाशी साधर्म्य आहे. महाप्रस्थानाला पाच पांडव द्रौपदीसह निघतात. चालता चालता द्रौपदीच प्रथम कोसळते. पुढे काही अंतरावरच भीम, अर्जुन, नकुल, सहदेव हे चार पांडवही कोसळतात. युधिष्ठिर एकटाच पुढे निघून जातो.

मृत्यूची आराधना करीत पडलेल्या द्रौपदीजवळ भीमसेन सरपटत जातो आणि त्या ठिकाणी दोघांचा अखेरचा संवाद होतो. 'युगान्त'सारख्या संपूर्ण संशोधनात्मक ग्रंथात इरावतीबाईंनी लिहिलेला हा एकमेव काल्पनिक प्रसंग. मी त्यामध्येच थोडासा फरक करून तो कादंबरीसाठी स्वीकारला आहे. माझ्या कादंबरीत भीमसेनाऐवजी अर्जुन द्रौपदीजवळ सरपटत येतो इतकेच. कै. इरावतीबाईंच्या नि माझ्या तपशिलामध्ये फरक असला तरी तत्त्व एकच आहे.

प्रामुख्याने वरील दोन ग्रंथकर्त्यांचा आणि ज्यांचे ज्यांचे संदर्भग्रंथ मी या कादंबरीसाठी वापरले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

ही कादंबरी लिहीत असताना वेळोवेळी मला अनेक सुहृदांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. प्रामुख्याने डॉ. गजानन शंकरराव सुर्वे, डॉ. एस. एस. भोसले, प्राचार्य सौ. विजयाताई पाटील, प्राचार्य र. म. चिटणीस, बॅ. पी. जी. पाटील, कै. डॉ. धनंजय कीर, डॉ. गो. म. पवार, कादंबरीकार अनंत तिबिले, सौ. उर्मिला तिबिले, प्रा. सौ. अनुराधा गुरव, प्रा. तुकाराम पाटील, प्राचार्य एस. वाय. पाटील (ज्योती कॉलेज, बेळगाव), प्राचार्य व्ही. ए. पाटील (भाऊराव काकतकर कॉलेज, बेळगाव), पत्रकार श्री. म. सु. कारेकर या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

माझी प्रिय पत्नी सौ. जयश्री हिने मला वेळोवेळी लेखन कामात मदत केली. तसेच माझा लहान बंधू विवेकानंद याने आपल्या सुंदर हस्ताक्षरात कादंबरीची मुद्रणप्रत तयार करून दिली. त्यांच्याकडून भविष्यकाळातही अशीच सहकार्याची अपेक्षा करतो.

ही कादंबरी प्रकाशनाची जबाबदारी अजब पब्लिकेशनचे श्री. शितल मेहता यांनी स्वीकारली, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

ही कादंबरी मराठी रसिक वाचकांना आवडली आणि त्यांनी पसंतीची पावती दिली, तर महाभारतावर आणखी दोन कादंबऱ्या लिहिण्याचा माझा मानस आहे. पण सध्या तरी सात-आठ वर्षे उरीपोटी जोपासलेल्या द्रौपदीला आणि त्याचबरोबर महाभारतातील सर्व व्यक्तिरेखांना मी साश्रू नयनांनी निरोप देत आहे....!

**भास्कर जाधव**

# भाग १

# एक

का कुणास ठाऊक ? पण आज मला खूप काही सांगावसं वाटतंय. आपलं मनोगत जगापुढं उघडं करावंसं वाटतंय. एका युगान्तापासून दुसऱ्या युगान्तापर्यंत अंत:करणाच्या गाभाऱ्यात जपून ठेवलेलं. शल्य आज सर्वांना उघडून दाखववांवसं वाटतंय. मखमली हृदयावरच्या जखमेची खपली आज स्वत:च्या नखानं उचकटून काढावीशी वाटतेय. होऊ द्या पुन्हा एकदा रक्तस्राव. दिसू दे जगाला भळभळणारी जखम. निदान जिला आजतागायत यशस्विनी म्हणून संबोधिली गेली त्या द्रौपदीचं खरं जीवन काय होतं हे तरी जगाला कळेल. वरकरणी आनंदी दिसणारी द्रौपदी आयुष्यभर कसल्या वणव्यात जळत होती ते तरी सर्वांना समजून येईल.

वास्तविक मी हे यापूर्वीच बोलायला हवं होतं. जग माझ्या यशस्वी जीवनाचा डांगोरा पिटत असतानाच मी त्याला ओरडून सांगायला पाहिजे होतं. प्रत्येक संकटाला हसत सामोरी जाणारी द्रौपदी, दु:खातही सुखाला हसणारी द्रौपदी आयुष्यभर कसल्या वेदना उरी पोटी घेऊन जगत होती, हे एकदा जगाला सांगायलाच हवं होतं. म्हणजे मग भारतीय इतिहासाचा जयजयकार करणाऱ्यांच्या जिभा लुळ्या पडल्या असत्या. पांडवांचे गुणगौरव करणाऱ्यांचे कंठ एकाएकी सुकले असते. आयुष्यभर उरी पोटी जपलेली आंधळ्या भक्तांची दैवतं धडाधड कोसळून पडली असती. पाप आणि पुण्याच्या व्याख्या बदलल्या असत्या.